मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव विज्ञान विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र पीएच. डी. पदवीच्या संशोधनाचा सारांश आराखडा

संशोधक
रामेश्वर एकनाथ हिंगरूपे
सामाजिक शास्त्रे संकूल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्गदर्शक
प्रा. डॉ. दुर्गादास दिगांबर चौधरी
महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर

संशोधन केंद्र
सामाजिक शास्त्रे संकूल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

2023

मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023)

प्रस्तावना

कोणत्याही देशाच्या आर्थिक विकासात पुरुषांच्या बरोबरीने महिलांचे स्थान असेल तरच त्या आर्थिक विकासाला मानवीय चेहरा मिळतो. देशाच्या लोकसंख्ये मध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढत आाहे. परंतु पुरुषांच्या तुलनेमध्ये ते अजूनही कमी आहे. तसेच आर्थिक अधिकारांच्या बाबतीत स्त्री व पुरुष यांच्या मध्ये मालमत्तेच्या मालकी संदर्भात मोठ्या प्रमाणात तफावत जाणवते. अशा स्थिती मध्ये महिलांचा आर्थिक विकास व्हावा, महिलांचे सक्षमीकरण व्हावे म्हणून शासन स्तरावर विविध योजना राबविल्या जातात. वेगवेगळ्या वित्त संस्थांच्या व बँकाच्या माध्यमातून तसेच सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिलांना प्राधान्याने पतपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जातो. ज्यामुळे महिला स्वतःचा व्यवसाय सुरु करून आर्थिक दृष्टया सक्षम होतील. या प्रक्रियेत सहकार क्षेत्रातील सोसायटी प्रकारातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड यांच्या मराठवाड्यातील विविध शाखांच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजनांच्या द्वारे करण्यात येणारा पतपुरवठा महिलांना लाभदायी ठरत आहे. मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखा महिलांच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहेत.

सहकार ही एक जीवनशैली आहे. सहकार म्हणजे एकत्र, एकजुटीने काम करणे. समाजातील विविध घटकांचे एकमेकांशी बरोबरीच्या नात्याने परस्परांच्या उन्नतीसाठी प्रामाणिकपणे सहकार्य करणे ही सहकाराची प्राथमिक संकल्पना आहे. सहकार चळवळ जरी दुर्बल घटकांच्या विकासासाठी विकसित झाली असली तरी समाजातील सर्व दुर्बल घटक या चळवळीत सारख्याच प्रमाणात सहभागी झाले नाहीत किंवा समाजाच्या सामाजिक स्थितीनुसार त्यांचा सहभाग कमी अधिक असलेला आढळतो. सहकार चळवळ जशी दुर्बल घटकनिहाय वेगवेगळ्या तीव्रतेने विकसित झाली तशीच प्रवेशनिहाय विकासाचे वेगळे आकृतिबंध विकसित झाले. महाराष्ट्रात सहकार चळवळ मंद गतीने विकसित झाली तसेच दुर्बल घटकातील सर्वात मोठा दुर्बलांचा गट स्त्रिया या चळवळीपासून दूर राहिल्या. स्त्रिया ग्रामीण भागातील असो किंवा शहरी त्यांच्या आर्थिक विकासाच्या संधी भारतीय परंपरेत अगदी कमी असतात. भारतीय परंपरेने स्त्रीचे क्षेत्र चूल आणि मूल एवढेच सीमित केले आहे. परंतु भारतातील पुरोगामी चळवळ ही फुले, शाहू, आंबेडकर विचार परंपरेने स्त्रियांना समानतेकडे वाटचाल करण्याचे बळ देते. डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखालील घटना समितीने स्त्रियांचे पुरूषाच्या बरोबरीने स्थान कायदेशीररित्या मान्य केले. त्यामुळे देशाच्या विकास प्रक्रियेत स्त्रियांच्या भूमिकेचा विचार करण्यात सुरूवात झाली. यातून स्त्रियांसाठी रोजगार, स्वयंरोजगार

उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना तयार करण्यात आल्या. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी ग्रामीण व नागरी भागासाठी राबवण्यात आलेल्या योजनांचे यश पाहिल्यावर स्त्रियांच्या आर्थिक उन्नतीसाठी फक्त स्त्रियांनीच चालविलेल्या सहकारी आणि संघटना यांना 100 टक्के अनुदान देण्याची केंद्रीय योजना आखण्यात आली. 1993-94 साली ही योजना सुरू करण्यात आली. शेतीवर आधारीत उद्योग / व्यवसायांमध्ये स्त्रियांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्याद्वारे त्याच्या उत्पन्नात भर घालण्यासाठी महिला सहकारी संस्थांची स्थापना करून त्यांना रोजगार हमी देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात महिलांची सहकार चळवळ 1985 पासून जोमाने सुरू झाली. त्याअगोदर 20 नोव्हेंबर 1971 रोजी इचलकरंजी येथे महाराष्ट्रातील पहिल्या महिला बँकेची स्थापना झाली. महिलांसाठी माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी 1973 मध्ये जळगाव येथे 'प्रतिभा महिला सहकारी बँकेची' सुरुवात केली. महिलांसाठी महिलेने सुरू केलेली ही एकमेव बँक होती.

भारतातील बहुराज्यीय सहकारी संस्था चळवळीचे मूळ कृषी आणि संबंधित क्षेत्रांमध्ये आहे. पहिला पत सहकारी संस्था कायदा 1904 मध्ये लागू करण्यात आला. त्यानंतर "सहकारी संस्था कायदा" नावाचा अधिक व्यापक कायदा लागू करण्यात आला. या कायद्याने बहुराज्यीय सहकारी संस्थेच्या निबंधक पदाची निर्मिती आणि विविध कारणांसाठी सहकारी संस्थांची नोंदणी आणि लेखापरीक्षण करण्याची तरतूद केली आहे. 1919 च्या मोंटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा अंतर्गत सहकार्य हा प्रांतीय विषय बनला आणि प्रांतांना त्यांचे स्वतःचे सहकारी कायदे बनवण्याचा अधिकार देण्यात आला. भारत सरकारच्या 1935 च्या कायद्यानुसार सहकारी संस्थांना प्रांतीय विषय मानले गेले. इस्को सहकारी संस्था हा भारतीय राज्यघटनेच्या राज्य यादीतील नोंद क्रमांक 32 अंतर्गत राज्याचा विषय आहे. एकापेक्षा जास्त प्रांतातील सदस्यत्व असलेल्या सहकारी संस्थांना समाविष्ट करण्यासाठी, भारत सरकारने बहुराज्यीय सोसायटी कायदा 1942 लागू केला. हा कायदा एकापेक्षा जास्त प्रांतामध्ये कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी संस्थांच्या समावेश आणि संपुष्टात आणण्याशी संबंधित आहे. कालांतराने सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवणारे कायदे एकत्रित करण्यासाठी सर्वसमावेशक केंद्रीय कायद्याची गरज भासू लागली. यासाठी भारतीय राज्यघटनेच्या केंद्रीय यादीतील एंट्री क्रमांक 44 अंतर्गत संसदेद्वारे बहुराज्य सहकारी संस्था कायदा 1984 लागू करण्यात आला. स्वातंत्र्यानंतर, गरिबी निर्मूलन आणि जलद सामाजिक-आर्थिक वाढीसाठी सहकारी संस्थांना खूप महत्त्व प्राप्त झाले. ते पंचवार्षिक योजनांचा अविभाज्य भाग बनले. परिणामी ते भारतीय अर्थव्यवस्थेतील एक वेगळे विभाग म्हणून उदयास आले. यानंतर मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी या शब्दाची व्याख्या एमएससीएस कायदा 2002 च्या कलम 3(पी) अंतर्गत करण्यात आली आहे. व्याख्येमध्ये असे नमूद केले आहे की, बहु-राज्य सहकारी संस्था ही एक संस्था आहे जी या कायद्याअंतर्गत नोंदणीकृत असल्याचे मानले जाते.

इवलेंसे रोप लावियलें द्वारी । त्याचा वेलु गेला गगनावेरी ॥ वट वृक्षाचे बीज मोहरीहून लहान असते. त्याला मायेने पाणी घालाव लागतं. जबाबदारीनं जोपासाव लागतं तेव्हा त्याचा विशाल वट वृक्ष होतो. नांदेड व बाजूच्या परिसरात अनेक राष्ट्रीयकृत सहकारी बँका व पतसंस्था होत्या परंतु बेरोजगार महिला सर्व सामान्य कष्टकरी यांना कर्ज देणारं कोणी नव्हतं. कर्ज मागताना कागदपत्रांची पूर्तता करताना होणारी दमछाट, अडवणूक यामुळे नाइलाजाणे सामान्य माणसाला सावकाराच्या दारात जावावं लागायचं. ज्यांची बाजारात पत नाही, ज्यांना कोणी जमानतदार नाही, ज्यांच्या कडे तारण ठेवायला काहीही नाही परंतु ज्यांना आयुष्यात नवीन काही निर्माण करायचं असेल तर अशा व्यक्तींना आधार मिळावा म्हणून मा. श्री हेमंत श्रीराम पाटील व सौ. राजश्री हेमंत पाटील यांनी 8 मे 2013 रोजी गोदावरी अर्बनची मुहूर्त मेढ रोवली 4 राज्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदीने ज्या प्रमाणे काठावरील सर्वांचे आयुष्य सुजलाम सुफलाम केले. त्याच गोदावरीच्या नावाने सुरु केलेली पतसंस्था खऱ्या अर्थाने गरीबांच्या आयुष्यांना अर्थसिंचन करणारी ठरली, 14 जुलै 2013 रोजी श्री सुर्यकांत देसाई गुरुजी, कै. शिवलींग शिवाचार्य महाराज, श्री बाबा बलविंदर सिंग जी महाराज यांच्या शुभहस्ते वटवृक्षाचं रोपटं लावून पतसंस्थेची सुरुवात करण्यात आली.

पहिल्याच दिवशी 3 लाखांच्या ठेवी व 29,700 रुपये भांडवलावर आणि 7 कर्मचारी घेऊन या पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. राजश्री हेमंत पाटील यांनी या प्रवासाची सुरुवात केली. त्या महिला बचत गटाचे काम करीत असल्याने अनेक महिला पतसंस्थे सोबत जोडल्या गेल्या. सोपी सुलभ कार्य प्रणाली, अडचणीच्या प्रसंगी योग्य वेळी होणारी मदत त्यामुळे बेरोजगार व छोटे व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या आर्थिक विकासाला चालणा देण्यासाठी या पतसंस्थेचा हातभार लागत आहे. गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड म्हणुन 5 राज्यात नावाजली जाऊ लागली. मा. खा. हेमंत श्रीराम पाटील हे या सोसायटीचे संस्थापक तर या सोसायटीचे अध्यक्षा सौ. राजश्री हेमंत पाटील आहेत. या सोसायटी ने अल्पावधीतच केलेली प्रगती खरोखरच डोळे दिपवणारी आहे. या कालावधीत काही पुरस्कार या सोसायटीला प्राप्त झाले आणि सौ. राजश्री हेमंत पाटील यांची दखल नीती आयोगाने घेतली आहे आणि त्यांची देशातील 100 कर्तृत्ववान महिलांमध्ये निवड करण्यात आली आहे. सुरुवातीला हा मध्यमवर्गीयांचा उपक्रम होता. सध्या जवळपास महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, गुजरात या 5 राज्यात 96 शाखा असून महिलांच्या आर्थिक परिस्थिती सुधारण्यात महत्वपूर्ण भुमिका निभावत आहेत.

2) संशोधनाचे महत्त्व

महिलांना आत्मसन्मान दिला पाहिजे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे खूप गरजेचे असते. ज्या घरातील स्त्री कमावती असते तेव्हा तिला समाजात, घरांमधे चांगला सन्मान

मिळतो व कुटुंबातील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी साह्य ठरतात. परंतु या सर्व गोष्टींची माहिती व जाणीव करून कसे द्यावे हा प्रश्न उपस्थित राहतो. म्हणुनच या प्रस्तुत विषयाद्वारे GUMCCSLN मार्फत महिलांना होत असलेल्या लाभांचा अभ्यास केल्यामुळे मराठवाड्यातील इतर महिला जे की या क्षेत्रापासून दूर व अज्ञात आहेत. तसेच चूल आणि मूल इतपर्यंतच मर्यादित आहेत अशा महिलांपर्यंत कर्ज, ठेवी, लघु उद्योग बचत गटामध्ये सहभागी व्हावे या साठी व ज्या महिलांची प्रगती झाली व आर्थिक दृष्टया सक्षम झाले हे इतर महिलांपर्यंत पोहोचल्यावर निश्चितच इतर महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल तसेच त्यांच्या समोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देता यावे ही ताकत निर्माण करण्याचा प्रयत्न या संशोधनामुळे होणार आहे. मराठवाडा क्षेत्रातील लोकांच्या जीवनावर या सोसायटीचा कितपत परिणाम झाला? या सोसायटीच्या क्षेत्रामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा हे क्षेत्र लाभ घेते का ? महिलांच्या आर्थिक स्थिती मध्ये सुधारणा होऊन त्यांचे राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे का? कोणत्या उपाययोजना योजाव्यात इ. बाबी जाणून घेण्यासाठी सहकार क्षेत्रातील प्रस्तुत विषयाचे चिकित्सक अभ्यास हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

3) समस्या सुत्रण

सदरील “मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023) या संशोधनामध्ये सदरील सोसायटी ही किती प्रमाणात महिलांना कर्जपुरवठा करते? पतपुरवठ्या मुळे महिलांची आर्थिक स्थिती सुधारली का? महिलांना रोजगार मिळाला का? व्यवसाया मध्ये महिला प्रवेश करीत आहेत का? सोसायटी नफ्याचे प्रमाण किती आहे? ही सोसायटी सभासदांचे हीत जोपासते का? संचालक मंडळ योग्य भूमिका पार पाडते का? कर्मचारी योग्य प्रमाणात कार्य करतात का ? नवीन आधुनिक संकल्पनांचा वापर केला जातो का? सोसायटी शांखांच्या प्रमाणात वाढ झाली आहे का? खातेदारांना योग्य वेळी सेवा पुरविल्या जातात का? अशा अनेक समस्यांचे निराकरण सदरील शोध प्रबंधातून करण्यात येणार आहे.

4) संशोधन साहित्याचा आढावा

ज्ञानाच्या कोणत्याही शाखेत नवीन तथ्यांच्या शोधासाठी काळजीपूर्वक केलेले अन्वेषण किंवा परिक्षण म्हणजे संशोधन होय. संशोधकाने निवडलेल्या विषयक्षेत्राशी संबंधित साहित्याचे वाचन व मनन हा अन्वेशनात्मक अध्ययनातील एक महत्वाचा भाग आहे. यानुसारच “मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023)” या विषयाचे संशोधन

करीत असताना काही निवडक संशोधन साहित्याचा परामर्श घेण्यात येणार आहे. यामध्ये सहकारी कायदे, समित्या, पतसंस्था यावर आधारीत झालेल्या संशोधनाचा संबंधित शोध प्रबंधात आढावा घेण्यात येईल.

5) संशोधनाची उद्‌दीष्टे

1) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांतील बदलत्या प्रवृत्तीचा मागोवा घेणे.
2) गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या मराठवाड्यातील विविध शाखेतील ग्राहक सेवेच्या योजनांचा अभ्यास करणे.
3) महिला स्वंय रोजगारासाठी मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांनी केलेल्या पतपुरवठा धोरणाचे अध्ययन करणे.
4) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखेतील लाभार्थी असलेल्या महिलांच्या आर्थिक स्थित्यंतराचे तुलनात्मक अध्ययन करणे.
5) गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या मराठवाड्यातील विविध शाखांच्या महिला ग्राहकांसाठीचा पतपुरवठ्यातील तफावतीचे अध्ययन करणे.
6) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखेतील महिला लाभार्थींना केल्या गेलेल्या पतपुरवठा व थकबाकीचे प्रमाण अजमावणे.

6) संशोधनाची गृहीते

1) मराठवाड्यातील सहकारी चळवळ विकसित असल्याने गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड चा विकास झाला आहे.
2) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांच्या कर्ज वसुलीत घट होत असून थकबाकीचे प्रमाण वाढत आहे.
3) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखेतील महिला लाभार्थ्यांसाठीच्या पतपुरवठ्यामुळे महिला लाभार्थ्यांचे जीवनमान सुधारत आहे.
4) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांच्या प्रगतीत कुशल व्यवस्थापण आणि कर्मचारी यांचा महत्वाचा संबंध आहे.

5) मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखेत महिला ग्राहकांसाठीच्या पतपुरवठ्यात तफावत आहे.

7) संशोधन पद्धती

मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023) सदरील समस्या विधानाचे संशोधन करत असताना शास्त्रीय पद्धतीने संशोधन करण्यासाठी सामाजिक शास्त्रामध्ये संशोधनाच्या विविध पद्धती आहेत. विविध संशोधन पद्धती पैकी सदरील संशोधन हे सर्वेक्षणात्मक, वर्णनात्मक व निरीक्षणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाईल. तसेच सांख्यिकीय विश्लेषणात्मक पद्धती हे या संशोधनाचे मुख्य उद्देश आहे.

1) संशोधन आराखडा

प्रत्येक विषयाच्या संशोधन करण्यासाठी संशोधन आराखड्याची अत्यंत आवश्यकता असते. संशोधन आराखडा व्यतिरिक्त वस्तुनिष्ठ अर्थशास्त्रीय संशोधन करणे अशक्य आहे. नमुना निवड किती व कसे निवडायचे, तथ्य संकलन, विश्लेषण कसे करता येईल तसेच संशोधन पद्धती कोणती वापरायची इत्यादी बाबी या संशोधन आराखड्यात ठरविले जाते. प्रस्तुत विषयाचे संशोधन करण्यासाठी संशोधकाने समस्येच्या निर्धारणापासून ते संशोधन अहवाल या शेवटच्या पायरी पर्यंत योग्य प्रकारे विचार विनिमय करून व उपलब्ध पर्यायांवर लक्ष देऊन कमीत कमी प्रयत्न, वेळ, पैसा खर्च करून जास्तीत जास्त प्रमाणात संशोधन उद्दिष्टांची उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी संशोधन विषयाची निश्चिती केली आहे व त्या उद्दिष्टांच्या आधारे संशोधन आराखडा निश्चित केला आहे. त्यानुसार वर्णनात्मक, सर्वेक्षणात्मक, अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याची अवलंब करून संशोधन करण्यात येणार आहे.

2) नमुना निवड

मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासातील गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023) अभ्यासण्यासाठी गोदावरी अर्बन पतसंस्थेच्या मराठवाड्यातील एकूण 19 शाखांपैकी 10 शाखा या साधा यादृच्छिक नमुना (Simple Random Sampling) निवड पद्धतीने निवडणार आहे. तसेच महिला लाभार्थ्यांची निवड ही 10 शाखातील प्रत्येक शाखेतून 40 लाभार्थी हे स्तरीय यादृच्छिक नमुना (Stratified Random Sampling) निवड पद्धतीद्वारे करणार आहे. 40×10=400 प्रश्नावली तयार करण्यात येतील.

3) तथ्य संकलन

संशोधनात संशोधन समस्या किंवा घटनांच्या कारणांचा आणि परिणामांचा शोध घेण्यासाठी, यथार्थ बोध घेण्यासाठी समस्येच्या निराकरणासाठी, तुलनात्मक अध्ययनासाठी परिवर्तनाच्या अध्यायनसाठी नियोजनासाठी संशोधनाचा आधार बनून संशोधनात तथ्यसंकलनाला विशेष महत्व प्राप्त होते. सुरुवातीला तथ्ये एकमेकांत मिसळलेली असतात. घटनेचे कारण व प्रभाव जाणून घेणे आणि निष्कर्षाला प्रमाणित करण्याच्या दृष्टीने तथ्यांना विशेषत्व प्राप्त करणे.

अश्या तथ्यांचे स्त्रोत आणि स्वरूप या आधारावर तथ्यांचे मुख्यतः दोन प्रकार पडतात.

A) प्राथमिक सामुग्री स्त्रोत

मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड या सोसायटी चा अभ्यास करण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. मराठवाड्यातील या सोसायटी च्या काही निवडक शाखा नमुना निवड पध्दतीनुसार निवड करण्यात येणार आहेत. तसेच प्रस्तुत अध्ययनात सन 2013 ते 2023 मध्ये मराठवाड्यातील सभासदांकडून प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी संस्थेचे चेअरमन, कार्यकारी संचालक, सभासद, सचिव, कर्मचारी वर्गाकडून तसेच महिला लाभधारकांकडून प्रश्नावलीद्वारे तसेच मुलाखत, निरीक्षणाद्वारे माहिती गोळा करुन माहितीचे विश्लेषण केले जाईल. सभासद हा संस्थेचा आत्मा असल्याने सभासदांचे जमीन धारणेनुसार वर्गीकरण करून त्यांच्याकडून प्रश्नावलीद्वारे माहिती भरुन घेतली जाणार आहे.

B) दुय्यम सामुग्री स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक स्त्रोतांबरोबर दुय्यम स्त्रोतांचाही वापर करण्यात येईल. या स्त्रोतांमध्ये मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड नांदेड सन 2013 ते 2023 या वर्षातील लाभधारकांचा अहवाल गोळा करुन त्यांचे आर्थिक विश्लेषण केलेले आहे. तसेच याबरोबर भारतीय जनगणना अहवाल, भारताच्या तसेच महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल, मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, एम.फील तसेच पी.एच.डी, प्रबंध, वृत्तपत्रीय बातम्याचे संकलन इ. दुय्यम साधनांद्वारे माहिती गोळा केली जाईल.

4) तथ्यांचे विश्लेषण

तथ्यांचे संकलन प्रक्रियेनंतर तथ्यांना अंतीम रूप देण्यासाठी संकलीत तथ्यांना योग्य पद्धतीने प्रक्रिया करून गुणात्मक व संख्यात्मक माहिती वेगळी करून माहितीचे विश्लेषण व निर्वाचन केल्यानंतरच त्या तथ्यांना

महत्वपूर्ण सामान्य अर्थ स्पष्ट होतो आणि त्या आधारे निश्चित निष्कर्ष काढणे शक्य होते व त्यानंतरच तथ्यांना सैद्धांतिक अर्थ प्राप्त होतो. माहिती विश्लेषण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना अंतिम रूप देण्यासाठी वर्गीकरण, संकेतीकरण, मास्टर चार्ट, आलेख, स्तंभलेख, सारणी आणि सांख्यिकीय सॉफ्टवेअर जसे spss (statistical packages for social sciences) इत्यादींचा उपयोग करण्यात येईल.

8) संशोधनाची मर्यादा व व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची संशोधन मर्यादा ही निश्चित करणे आवश्यक असते. "मराठवाड्यातील महिलांच्या आर्थिक विकासात गोदावरी अर्बन मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह चे योगदान एक चिकित्सक अभ्यास (2013 ते 2023)" या संशोधन विषयाचे अभ्यास करण्यासाठी गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड या सोसायटी कडून 2013 ते 2023 या कालावधीत लाभ घेणाऱ्या मराठवाड्यातील ग्रामीण व शहरी भागातील केवळ महिलांपुरते मर्यादित आहे. तसेच अपुरा सोसायटीचा डाटा अणि उत्तरदात्यांकडून प्रतिसादानुसार संशोधनाची मर्यादा निश्चित असेल.

9) संशोधनाचे क्षेत्र :

महाराष्ट्रांमध्ये प्रामुख्याने कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर असे सहा प्रशासकीय विभाग आहेत व 36 जिल्हे आणि 358 तालुके आहेत. छत्रपती संभाजीनगर या प्रशासकीय विभागाचे भौगोलिक नाव मराठवाडा असे आहे. हा विभाग आकारमानाने सर्वात मोठा आहे. यामध्ये 8 जिल्ह्यांचा समावेश आहे. मारठवाड्याचे एकूण क्षेत्रफळ 64811 चौ. कि. मी. आहे. छत्रपती संभाजीनगर हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर असून ही मराठवाड्याची राजधानी म्हणून ओळखले जाते आणि तिथे मराठवाडा विभागाचे विभागीय कार्यालय आहे. या विभागातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को- ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड चा अभ्यास करणार असून क्षेत्र मराठवाड्या पुरतेच मर्यादित आहे.

10) प्रकरण विभागणी

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पध्दती.

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रस्तावना, सहकाराच्या विकासाची संकल्पना, समस्येची मांडणी, व्याप्ती संकल्पनांचे स्पष्टीकरण, संशोधन अभ्यासाची उद्दीष्टये, गृहीतके, तथ्य संकलनाच्या पध्दती इ. चा समावेश या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचे सिंहावलोकन.

प्रस्तुत विषयाला अनुसरुन संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल. यामध्ये सहकार विषयाला अनुसरुन व नागरी सहकारी पतसंस्थांच्या दृष्टीकोनातून ज्या विचारवंतांनी, संशोधकांनी व लेखकांनी जो अभ्यास केलेला आहे. त्या संशोधनात्मक अध्ययनाचा विचारांचा मागोवा प्रस्तुत प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे : मराठवाड्यातील आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमीचा समावेश केला जाईल. यामध्ये मराठवाड्याचे भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ, ऐतिहासिक पार्श्वभूमी, भूपृष्ठ रचना, भूमी उपयोग, हवामान, पीक पद्धती, लोकसंख्या, शिक्षण, आरोग्य, जलसिंचन, वने व पर्यावरण, सहकार, बँका तसेच वित्त पुरवठा करणा-या सहकारी संस्था, वाहतूक व दळणवळण, उदयोग, कृषी क्षेत्र इ. चा समावेश करण्यात येईल.

प्रकरण चौथे : मराठवाड्यातील मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटींच्या वाटचालीचा आढावा घेणे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाच्या पहिल्या उद्दीष्टयानुरूप मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटींच्या इतिहासाचा, प्रगतीचा अभ्यास करण्यात येईल. यामध्ये विकासाची संकल्पना, सहकाराची संकल्पना, सहकाराचे तत्वे, सहकारी पतसंस्थांची रचना, सहकारी पतसंस्थांची उद्दीष्टये व कार्ये भारतातील सहकारी चळवळ, महाराष्ट्रातील सहकारी चळवळ, मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी च्या रचना, चळवळी, कायदे, उद्दिष्टे, इत्यादी संबंधीत सोसायटीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण पाचवे : गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या ग्राहक सेवेचे व महिला केंद्रित योजनेचे आर्थिक विश्लेषण.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड नांदेड च्या संख्या, सभासद, देणी, व्यवहार, कर्जाची वर्गवारी, अल्प मध्यम व दीर्घमुदतीच्या कर्जाची कारणपरत्वे वर्गवारी तसेच महिलांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदत कर्जाची येणेबाकी, थकबाकी उत्पन्न व खर्च इ.ची माहिती दिली जाईल.

प्रकरण सहावे : गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या लाभार्थी महिलातील आर्थिक स्थित्यंतराचे तुलनात्मक अध्ययन.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखेतील महिलांच्या सोसायटी च्या सहाय्या पूर्वी ची परिस्थिती आणि सोसायटीच्या साहाय्यामुळे त्यांच्या जीवनमानातील सुधारणांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे : मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांच्या महिला ग्राहकांसाठीच्या पतपुरवठ्यातील तफावती चे अध्ययन करने.

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नांदेड च्या विविध शाखांच्या महिला ग्राहकांसाठीच्या पतपुरवठ्यातील तफावती, बदल, समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण आठवे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधन कार्यातून जे निष्कर्ष मिळतील. त्या संदर्भातील माहिती तसेच मराठवाड्यातील गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड नांदेड च्या चिकित्सक अध्ययनातून आलेल्या समस्या तसेच लाभ धारक व सभासदांच्या दृष्टीकोनातील समस्या व गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव सोसायटी लिमिटेड नांदेड च्या समस्या सोडविण्यासाठी निष्कर्षानुसार विविध उपाययोजना सुचविण्यात येतील. यासंबंधीची प्रमुख शिफारशी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

संदर्भ

1) प्रदीप आगलावे (2008) सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2) श्री. के. ए. जाधव, नागपूर बहुराज्यीय सहकार कायदा प्रकाशन क्र. 103 प्रथम आवृत्ती 1 जून 2012.
3) मराठवाडा 2001 खंड 1 व 2 संयोजन समिती, विकास भवन, औरंगाबाद जुन 1988.
4) कुलकर्णी SR अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अनमोल प्रकाशन नवी दिल्ली 1996.
5) कोलम शरम भा. बँकींग ची तत्वे आणि भारतीय बँका व्दितीय आवृत्ती किया प्रकाश नागपुर जुलै 1965.
6) संतोष दास्ताने महाराष्ट्र 2006 रामचंद्र दास्ताने आणि कंपनी पुणे 2006 त्रैमासिक.
7) अर्थसंवाद विविध अंक मराठी अर्थशास्त्र परिषदे चे त्रैमासिक.
8) इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्हू नवी दिल्ली.
9) महाराष्ट्र आर्थिक पाहणी (विविध अंक अर्थ व सांखिकीय चलनाल महाराष्ट्र राज्य संचालन मुंबई).

10) विविध दैनिक.

11) विविध वेबसाईट्स.

12) मल्टिस्टेट बँकांची वार्षीक अंक.

13) Karve, D. G. Co-operation : Principles and Substance, Calcutta, 1968.

14) Dalaya, Chandra K. Sabnis, Ravindra S. Co-operation in Maharashtra, Bombay, 1973.

15) ए. बी. सौदी सर महाराष्ट्राचा भूगोल निराली प्रकाशन आठवी आवृत्ती 2017.

संशोधक

रामेश्वर एकनाथ हिंगरूपे

सामाजिक शास्त्रे संकूल

स्वा. रा. ती. म. वि. नांदेड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. दुर्गादास डी. चौधरी

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर